क्र. नप्रसई१००३/प्र.क्र. ३६८ /०३/५
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०३०.
दि. ३ जानेवारी २००४

प्रति,
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
सर्व.

**विषयः नगरपरिषदांनी विहित पध्दतीचा अवलंब न करता केलेल्या अनियमित नेमणुकांबाबत.**

नगरपरिषदांनी त्यांच्या मंजुर आस्थापनेवर शासनाने विहित केलेल्या पधतीने पदांची भरती करणे आवश्यक असून अशा स्वरुपाची अभिप्रेत विधीग्राहय कार्यवाही न करता त्यांच्या आस्थापनेवर रोजंदारी कर्मचारी नियुक्ती/ मंजुर पदे नसतांना मानधनावर नियुक्ती / विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता केलेली अनियमित नियुक्ती अशा सर्व नियुक्त्या या नगरपरिषदेवर अनावश्यक आर्थिक भार टाकणा-या/नियमबाहय खर्च करणा-या कृती असून अशा स्वरुपाचा अनावश्यक नियमबाहय आस्थापना खर्च हा महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ३१० अन्वये संचालनालयाच्या मते अनावश्यक व अवाजवी आहे. रोजंदारी कर्मचा-यांच्या बाबतीत शासनाने वेळोवेळी घेतलेले निर्णय विचारात घेऊन व मलकापूर नगरपरिषदेच्या संदर्भात याचिका क्र.६४०/९७ मधील मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांच्या दि. १७.७.२००२ च्या निर्णयास अधीन राहून खालील सूचना देण्यात येत आहेत.

१. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. बीसीसी११८९/सीआर १८३/९५/३ दि.२४ जून १९८६ अन्वये नगरपरिषदांनी रोजंदारी कर्मचारी भरती न करण्याबाबत तसेच नेमणुकीस जबाबदार अधिकारी / पदाधिकारी हे मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० चे तरतुदीनुसार वसुलीस पात्र राहतील अशा सूचना निर्गमित केल्या होत्या त्यामुळे दि. १.७.८६ नंतर अशा नेमणुकांना जबाबदार असलेल्या व्यक्तीवर वसूली लावणे आवश्यक आहे. दि.३०.६.८६ पूर्वी नेमणुका करणा-या जबाबदार व्यक्तींवर एकवेळचा अपवाद म्हणून जबाबदारी निश्चित करुन वसुली लावण्याची आवश्यकता नाही.

२. दि.१.७.८६ ते २७.३.२००० या कालावधीतील नगरपरिषदांचे अनियमित नेमणुकांचे प्रस्तावा मध्ये मलकापूर नगरपरिषदेच्या याचिका क्र.६४०/९७ मधील मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार या नियुक्तीस जबाबदार असणा-या नगरपरिषद अधिकारी/पदाधिकारी/कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ९६ मधील तरतुदीनुसार आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

काही नगरपरिषदांमध्ये अनियमित नियुक्त्यांचे संदर्भात मोठया प्रमाणात अनियमितता किंवा गैरव्यवहार झाले असल्याचे आढळून येत असेल तर अशा प्रकरणी मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० अन्वये विशेष लेखापरिक्षण करुन घेण्यासाठी स्थानिक निधी लेखा कार्यालयास कळविण्यात यावे. आपल्या विभागातील नगरपरिषदांचे दि. २७.३.२००० पर्यंतचे अनियमित नेमणुकांचे प्रस्ताव आपल्या अभिप्रायासह या कार्यालयाकडे निर्णयासाठी पाठवावेत.

नगरपरिषदेच्या अनियमित नियुक्त्यांचे प्रत्येक प्रकरणी आयुक्त व प्रादेशिक संचालनालयाच्या वतीने सखोल चौकशी करुन प्रत्येक प्रकरणातील दोषी अधिकारी/पदाधिकारी/कर्मचारी यांची नावे, कार्यालयीन हुद्दा, निवासी पत्ता तसेच त्यांच्याकडुन वसुलात आणावयाच्या रक्कमेचा तपशील (एकापेक्षा अधिक अधिकारी/पदाधिकारी/कर्मचारी अनियमित नियुक्तीस जबाबदार असल्यास नुकसानीची रक्कम समप्रमाणात निश्चित करण्यात यावी) इ. तदअुषंगीक माहितीसह प्रस्ताव वसुली संदर्भातील अंतीम निर्णयासाठी या संचालनालयाकडे सादर करण्यात यावेत.

३. महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री व महाराष्ट्र नगरपरिषद नगरपालिका कामगार संघर्ष समिती यांच्यामध्ये दि. २५.३.२००२ रोजी झालेल्या चर्चेतील निर्णयानुसार शासन नगर विकास विभागाचे पत्र क्र.नपाप्र १०९९/९९/१५९/९८/नवि-१६, दि.६.५.२००० व शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.संकीर्ण १०९९/२९४/प्र.क्र.७८/२०००/नवि-२७,दि.२८.९.२०००

अन्वये दि.१०.३.९३ पूर्वीच्या रोजंदारी कर्मचा-यांना नगरपरिषदेच्या नियमित सेवेत सामावुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

दि. ११.३.९३ ते दि. २७.३.२००० पर्यंतच्या काळात नगरपरिषदांनी नियुक्त केलेल्या रोजंदारी कर्मचा-यांना नियमित करण्याबाबत शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. तरी सर्व रोजंदारी कर्मचा-यांच्या नेमणुका अनियमित नेमणुका असल्याने या संचालनालयाकडून व आपल्या कार्यालयाकडून आतापर्यंत नियमित करण्यात आलेल्या रोजंदारी व अनियमित नेमणुकांच्या प्रकरणी परिच्छेद १ व २ नुसार जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही ३ महिन्यांचे आत पुर्ण करावी.

४. दि. १.७.८६ नंतर दि. २८.३.२००० पर्यंत ज्या नगरपरिषदांनी पदभरतीसाठी विहित पध्दतीचा अवलंब केला परंतू उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे अशा अनियमित नेमणुका केल्या असतील तर अशा नेमणुकांवर वसूली लावण्यात येऊ नये व असे प्रस्ताव आपल्या अभिप्रायासह या कार्यालयाकडे निर्णयासाठी सादर करण्यात यावेत.

५. दि.२८.३.२००० नंतर नगरपरिषदांनी रोजंदारीवर/ स्थायी अस्थायी पदावर अनियमित नेमणुका केल्या असतील तर या नेमणुकांना जबाबदार असलेल्या व्यक्तींवर मुद्दा क्र. २ मध्ये नमुद केल्याप्रमाणे नेमणुका करणारे अधिकारी/ पदाधिकारी/ कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन या नेमणुकांवरील कर्मचा-यांना प्रदान केलेल्या वेतन व भत्त्यावरील वसूल करावच्या रक्कमेचे प्रस्ताव आपल्या अभिप्रायासह या संचालनालयाकडे अंतीम आदेशासाठी पाठवावेत. तसेच या नेमणुकांवरील कर्मचा-यांच्या सेवा औद्योगिक कलह कायदा १९४७ मधील तरतदींनुसार संपुष्टात आणाव्यात. या कर्मचा-यांच्या सेवा संपुष्टात आणतेवेळेस औद्योगिक कलह कायदा १९४७ मधील कलम २५ (फ), २५(ह) तसेच आवश्क असल्यास संबंधित कायद्यातील इतर तरतुदी व प्रचलित असलेल्या सर्व कायद्यातील तरतुदींचे परिपुर्ण पालन करुन सेवा संपुष्टात आणण्याची गरज आहे. कर्मचा-यांना सेवेतून कमी करतांना जेष्ठतासुचीतील अंतिम क्रमाने सेवामुक्त करावे म्हणजे सर्वात कनिष्ठ कामगार प्रथम सेवामुक्त करण्यात यावा.

ज्या कर्मचा-यांची सेवा एक वर्षापेक्षा जास्त झाल्या आहेत (२४० दिवस) अशा कर्मचा-यांच्या बाबतीत आद्योगिक कलह कायदा १९४७ मधील कलम (फ) नुसार एक महिन्याची लेखी नोटीस व झालेल्या एकुण सेवेच्या प्रमाणात प्रत्येक वर्षासाठी १५ दिवसांचे सरासरी वेतन नुकसान भरपाई म्हणुन अदा करुन सेवा संपुष्टात आणावयाच्या आहेत. या कर्मचा-यांनी न्यायालयाकडून एकतर्फी स्थगिती मिळवू नये म्हणुन त्यांच्या सेवा समाप्त करण्यापुर्वी नगरपरिषदेने संबंधित न्यायालयामध्ये कॅव्हेट दाखल करावी. याच पध्दतीने दि.२८.३.२००० नंतर रोजंदारीवर नेमलेल्या, मानधनावर नेमलेल्या, ठराविक वेतनावर नेमलेल्या अस्थायी कर्मचाऱ्यांच्या सेवाही नगरपरिषदांनी संपुष्टात आणने अभिप्रेत असुन आपल्या कार्यक्षेत्रातील नगरपरिषदांकडून वर नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही तात्काळ होण्यासाठी आपल्या स्तरावरुन पाठपुरावा होण्यास विनंती आहे.

६. वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन सोबत जोडलेल्या तत्क्यात केलेल्या कार्यवाहीचा दर तीन महिन्यांचा प्रगती अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच आपल्या स्तरावर घेतल्या जाणा-या त्रैमासिक बैठकांमध्ये चर्चील्या जाणा-या विषयांमध्येही या विषयाचा समावेश करण्यात यावा.

( सुनील सोनी )
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय.

प्रत
१. जिल्हाधिकारी (सर्व) मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून, २. मुख्याधिकारी , नगरपरिषद ( सर्व),
२. उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व), ४. सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.

**नगरपरिषद आस्थापनेवरील अनियमित नेमणूकांचा तपशिल**

| अ.क्र. | न.प.चे नाव | जिल्हा | अनियमित नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या | | वसुलीची रक्कम निश्चित केलेल्या प्रकरणांची संख्या | | वसुलीचे आदेश निर्गमित केलेल्या प्रकरणांची संख्या | | अहवालाच्या मुदतीमध्ये वसुल केलेली रक्कम | वसुल करावयाची शिल्लक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ग-३ | वर्ग-४ | वर्ग-३ | वर्ग-४ | वर्ग-३ | वर्ग-४ | | | |
| १ | २ | ३ | ४-अ | ४-ब | ५-अ | ५-ब | ६-अ | ६-ब | ७ | ८ | ९ |